| MHTH270008092023 | |
|---|---|
| | दाखल तारीख : २९.०७.२०२२ |
| | नोंदणी तारीख : २९.०७.२०२२ |
| | निकाल तारीख : ०३.०२.२०२५ |
| | कालावधी:०२ वर्षे०६ महिने ०५ दिवस |

**निशाणी क्र.४९**

**जिल्हा न्यायाधीश २ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापूर, जिल्हा ठाणे यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन आधिकारी : पी. अे. साने)**

**सेशन्स केस नं. ९९/ २०२३**
जुना ठाणे सत्र खटला क्र.४५२/२०२२

गुन्हा रजि. क्र. I २१३/२०१९
पोलीस स्टेशन रबाळे नवी मुंबई

फिर्यादी : **महाराष्ट्र शासन**
फिर्यादीकरिता श्री. योगेंद्र पाटील,
अतिरिक्त सरकारी वकील

आरोपी : **१. रोहीत वेताळ अवताडे,**
वय २१ वर्षे, व्यवसाय: नोकरी,
रा. घणसोलीगाव, चिंचआळी, ओमसाई बिल्डींग, ए विंग, रूम नं.२०४

**२. स्वप्नील मारूती चिकणे,**
वय २२ वर्षे, व्यवसाय: नोकरी,
रा. रू.नं.२०४, बिल्डींग नं.एफ—८, आणासाहेब पाटील सोसायटी, सेक्टर—७, सिम्पलेक्स, घणसोली, नवी मुंबई.

**३. नितेश संदिप तांबे,**
वय २० वर्षे, व्यवसाय: व्यवसाय,
रा. रू.नं.१०२, बिल्डींग नं.एफ—३, ओमसाईधाम

सोसायटी, सिम्पलेक्स, सेक्टर—७,
घणसोली, नवी मुंबई.

४. सागर शंकर पाटील **(मयत)**

**५. अनुज नरेश मांडले,**
वय १९ वर्षे, व्यवसाय: नोकरी,
रा. पहिला माळा, गंगाई अपार्टमेंट, कौलआळी,
घणसोली, नवी मुंबई.

**आरोपीतर्फे वकील श्री. उमेश चिकणे.**

| | | |
|---|---|---|
| गुन्हयाची तारीख | : | ०५.०४.२०१९ |
| प्रथम खबरीची तारीख | : | ०६.०४.२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | : | २९.०७.२०२२ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | : | २९.०७.२०२२ |
| पुरावा नोंदवायला सुरुवात झाल्याची तारीख | : | २९.०८.२०२४ |
| निकालपत्र राखून ठेवल्याची तारीख | : | .. |
| निकालपत्राची तारीख | : | ०३.०२.२०२५ |
| शिक्षा सुनावली असल्यास त्याची तारीख | : | नाही. |

## आरोपीचा तपशील

| अनुक्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामिनावर सुटका झाल्याची तारीख | दोषारोप निश्चितीचे कलमे | निर्दोषमुक्ती की शिक्षा फर्मावली | फर्मावलेली शिक्षा | फौ. प्र. संहिता कलम ४२८ अन्वये शिक्षेतून मिळालेल्या सूट चा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोहीत वेताळ अवताडे | ०६.०४.१९ | | भा.दं.वि. कलम ३२६, ३०७, ५०४, ५०६, १४१, १४३, १४७, १४९ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) १३५ अन्वये | निर्दोषमुक्ती | निरंक | ... |
| २ | स्वप्नील मारूती चिकणे | ०६.०४.१९ | | ‘‘__’’ | निर्दोषमुक्ती | निरंक | ... |
| ३ | नतेश संदिप तांबे | ०६.०४.१९ | | ‘‘__’’ | निर्दोषमुक्ती | निरंक | ... |
| ५ | अनुज नरेश मांडले | ०६.०४.१९ | | ‘‘__’’ | निर्दोषमुक्ती | निरंक | ... |

**अ. अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयाने स्वतःहून तपासलेल्या साक्षीदारांची यादी**

| | **अभियोगपक्ष** | |
|---|---|---|
| **अनुक्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
| सा.क्र.१ | शैलेश रोहीदास टोम्पे, नि. क्र.९ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | साईनाथ विठ्ठल मुद्दल, नि.१२ | साक्षीदार |
| सा.क्र.३ | अजय रामचंद्र कुंभार, नि.१४ | तपासी अंमलदार |
| | | |
| | **बचावपक्ष** | |
| | निरंक | |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | **न्यायालयाचा साक्षीदार** | |
| | निरंक | |

**ब.**

| | **अभियोगपक्षाच्या निशाण्या** | **स्वरुप** |
|---|---|---|
| १ | १० | रिपोर्ट वरील सही |
| २. | १५ व १६ | जबाबमधील अधोरेखांकित भाग अ व ब. |
| ३. | १७ | जबाब सहीपुरती निशाणी. |
| ४. | १८ | छापील एफ.आय.आर. |
| ५. | १९ | घटनास्थळ पंचनामा |
| ६. | २६, २९,३१, ३४ | जप्ती पंचनामा |
| ७. | २१ ते २५ | अटक पंचनामे |
| ८. | २०, २७, ३०, ३२,३५ | मुद्देमाल पावती |
| ९ | २८, ३३ | निवेदन पंचनामा |
| १० | ३६ ते ३८ | ज्बाब |
| | ३९, ४० | वैदयकीय प्रमाणपत्र |
| | ४१ | सीसीटीव्ही फुटेज मिळण्यसाठी शाळेला दिलेले पत्र |
| | ४१ | शाळेने सीसीटीव्ही फुटेज बाबत दिलेले पत्र |
| | ४३ | कलम वाढ संदर्भातील पत्र |
| | ४४ | कलीना लॅब्रोटरीला पाठविलेले पत्र |
| | | |
| | **बचावपक्षाच्या निशाण्या** | |
| | | |
| | निरंक | |
| | | |

| | न्यायालयाच्या निशाण्या | |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. मुद्देमाल वस्तू :**

| | अभियोगपक्ष | |
|---|---|---|
| | .. | |
| | | |
| | बचावपक्ष | |
| | .. | |

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०३ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीर )

१. गुन्हा भारतीय दंडविधान कलम ३२६, ३०७, ५०४, ५०६, १४१, १४३, १४७ सह १४९ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) १३५ अन्वये दंडनीय.

२. फिर्यादी पक्षाची केस थोडक्यात अशी की, यातील फिर्यादी शैलेश रोहिदास टोम्पे याने दि.०६.०४.२०१९ ला पोलिसांना रिपोर्ट दिला की, ते घणसोली येथे झोपडपट्टीमध्ये राहत आहेत. त्यांच्या सोसायटीमध्ये त्यांचे बरेच मित्र असून ते संध्याकाळी गप्पा मारतात. दि.०५.०४.२०१९ रोजी दु.२.०० वा. ते व त्यांचे मित्र गप्पा मारत असतांना स्वप्नील चिकणे याने त्यांना शिवीगाळी करून हाताने मारहाण केली. सबब त्याने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. नंतर रात्री २०.३० वा. ते साईनाथ मुद्दल, गिरीष पोळ, तेजस शेडगे असे मैदानाचे कट्टयावरती बसून गप्पा मारत असतांना रोहीत अवताडे, नितीन तांबे, स्वप्तील चिकणे, सागर पाटील, किरण पाटील, साईनाथ मुद्दल याला बाजुला बोलून घेतले व सर्वजण मारू लागले. त्यावेळेला ते सदरचे भांडण

सोडवणे साठी गेले असता त्याला देखील लाथाबुक्क्याने मारहाण केली तर साईनाथच्या डोक्यात दगड मारला व स्वप्नीलने कोणत्यातरी धारदार चाकुसारख्या शास्त्राने गळयावरती वार करून दुखापत केली. त्यावेळेला रोहीत अवताडे याने देखील त्यांच्या डोक्यात दगड मारून दुखापत केली. अशा स्वरूपाची फिर्याद दिली. त्याने दिलेल्या फिर्यादी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

३. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. आरोपीतांकडून गन्हयात वापरलेला दगड, बांबु व चाकू हस्तगत केली. जप्तीचा पंचनामा केला व तपासामध्ये यातील आरोपीताने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले त्यामुळे त्यांनी आरोपीतांविरूध्द तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले.

४. सदरची केस ही सेशन्स कोर्टात चालण्यास पात्र असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०९ प्रमाणे वर्ग करण्यात आली.

५. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकूण नि.६ येथे आरोपीतांवर दोषारोप ठेवण्यात आले. सदरचे दोषारोप आरोपीतांना त्यांच्या बोली भाषेतून वाचून दाखवले असता त्यांनी ते अमान्य केले.

६. फिर्यादी पक्षाने आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्याचे कामी साक्षीदार तपासले.

७. आरोपीतांचे फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीतांचा बचाव की त्यांनी काही एक गुन्हा केलेला नाही.

८. आरोपीतांनी काही एक बचावाचे कामी साक्षीपुरावा दिलेला नाही.

९. यातील आरोपी सागर शंकर पाटील हे केस प्रलंबित असतांना मयत झाले. त्यांचा मयताचा दाखला नि.५१ वरती आहे. सबब, त्यांच्याबद्दल केस ॲबेट करण्यात आली व इतरांच्या विरूध्द केस चालवण्यात आली.

१०. फिर्यादी पक्षाची केस, त्याने सादर केलेला पुरावा, आरोपीतांनी फौ.

प्र.सं. कलम ३१३ मध्ये दिलेली प्रश्नांची उत्तरे व उभयबाजुंचा युक्तिवाद विचारात घेतल्या नंतर खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले असून मी त्यांचे निष्कर्ष त्याच्या सामोर खालील दिलेलया कारणमिमांसेवरून नोंदविलेले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की दि. ५.४.२०१९ रोजी सुमारे २०.३० वा. अे.एस.पी. शाळेसमोर, सेक्टर—९, घणसोली, नवी मुंबई येथे आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत करून पाच किंवा अधिक लोक एकत्र येउन गैरकायदा जमाव करून यातील फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम १४१ सह १४९ अन्वये गुन्हा केला? | नाही. |
| २) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत करून पाच किंवा अधिक लोकांचा गैरकायदा जमाव जमविला आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम १४३ सह १४९ अन्वये गुन्हा केला? | नाही. |
| ३) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत करून गैरकायदेशीर जमाव जमवून बळ प्रयोग किंवा हिंसाचार करण्याच्या दृष्टीने दंगा केला आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम १४७ सह १४९ अन्वये गुन्हा केला? | नाही. |
| ४) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत गैरकायदा जमाव जमवून साक्षीदार साईनाथ यास मारहाण केली व आरोपी क्र. | नाही. |

२ स्वप्नील याने साक्षीदार साईनाथ याचेवर प्राणघातक हल्ला करून त्याचे हत्येचा प्रयत्न केला आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम ३०७ सह १४९ अन्वये गुन्हा केला?

५) अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत करून गैरकायदेशीर जमाव जमवून मृत्युस कारण होण्याचा संभव राहिल असा दगड साक्षीदार साईनाथ याला मारून आरोपी क्र.२ स्वप्नील याने साक्षीदार साईनाथ याचे मानेवर व डोक्यावर चाकूने वार करून इच्छापुर्वक जबर दुखापत पोचवली आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम ३२६ सह १४९ अन्वये गुन्हा केला? — नाही.

६) अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत करून गैरकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदार यांच्या हातून सार्वजनिक शांततेचा भंग घडवून आणण्याच्या दृष्टीने त्यांना शिवीगाळी करुन अपमानीत केले आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०४ सह १४९ अन्वये गुन्हा केला? — नाही.

७) अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत करून गैरकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करून फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०६ सह १४९ अन्वये गुन्हा केला? — नाही.

८) अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी विधीसंघर्षीत आरोपी विशाल सोनी आणि फरार आरोपी किरण पाटील यांच्यासोबत संगनमत करून गैरकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करण्याचे उद्देशाने आरोपीतांनी स्वत:वळ चाकू — नाही.

बाळगला आणि त्याद्वारे पोलीस आयुक्त नवी मुंबई यांनी यांनी पारित केलेल्या जाक्र. पोआ/नमु/वि.शा./म.आ./१८११/२०१९, दि.३०.०३.२०१९ रोजीच्या आदेशाचे उल्लंघन केले आणि त्याद्वारे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) १३५ अन्वये गुन्हा केला?

९) काय आदेश ? — आरोपी यांस दोषमुक्त करण्यात येत आहे.

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ८ करीताः—</u>**

(वरील सर्व मुददयांच्या संदर्भात फिर्यादी पक्षाचा पुरावा हा एकच असल्याने व चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता वरील सर्व मुददयांची चर्चा एकत्रित केली आहे.)

११. फिर्यादी पक्षाच्या केसप्रमाणे यातील आरोपीताने दि.५.४.२०१९ रोजी पुर्वीचे भांडणाच्या कारणावरून गैरकायदा जमाव करून यातील फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली, दुखापत केली अशी फिर्यादी पक्षाची केस आहे.

१२. फिर्यादी पक्षाने यातील फिर्यादी यास साक्षीदार नं.१ म्हणून नि. ९ येथे तपासलेले आहे. सदर साक्षीदाराने अचानक कोणीतरी व्यक्तीने त्यांना मारहाण केली असे सांगितलेले आहे परंतु मारहाण करणा—या व्यक्तीस ते ओळखत नव्हते असे सांगितलेले आहे. सदर साक्षीदाराने यातील आरोपीतांनी त्याला व साईनाथला दगडाने आणि चाकूने मारहाण केल्याचे नाकारलेले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास फिर्यादी पक्षाने नोंदवला परंतु त्यामध्ये फिर्यादी पक्षाच्या केसला पुष्टी देणारे काहीएक बाबी निष्पन्न झाल्या नाहीत.

१३. सा.क्र.२ साईनाथ याने आपल्या पुराव्यामध्ये त्यांना कोणीतरी मारहाण केली असे सांगितलेले आहे परंतु आरोपीतांनी त्यांना मारहाण केली ही बाब नाकारलेली आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास अभियोग पक्षाद्वारे घेण्यात

आला परंतु त्या उलटतपासामध्ये फिर्यादी पक्षाच्या केसला पुष्टी देणारे काहीएक बाबी निष्पन्न झालेल्या नाहीत.

१४. सा.क्र.३ तपासी अंमलदार अजय कुंभार नि.१४ यांचे पुराव्यानुसार यातील सा.क्र.१ यांनी फिर्याद दिली. त्याअनुषंगाने त्यांनी ती नोंदवली. घटनास्थळाचा पंचनामा केला. तो नि.१९ येथे आहे. सरतपासाच्या दरम्यान आरोपीतांकडून दगड, चाकू व बांबू जप्त केला व पंचनामा केला. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवले. जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र उपलब्ध करून घेतले व तपासाअंती आरोपीतांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले असे त्याने सांगितलेले आहे. जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र नि.३९ व ४० या ठिकाणी आहे. त्या वैदयकीय प्रमाणपत्राप्रमाणे साईनाथ मुद्दल आणि साक्षीदार निलेश टोंपे हे जखमी असल्याचे दिसून येतात. परंतु या ठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की वरील फिर्यादी पक्षाने सादर केलेल्या पुराव्यातून त्या दोन्ही साक्षीदाराने फिर्यादी पक्षास सहकार्य केलेले नाही. दोन्ही साक्षीदाराने आरोपीतांनी त्यांना मारहाण केल्याचे नाकारलेले आहे. अशा स्थितीमध्ये सदर दोन्ही साक्षीदारांचा पुरावा हा फिर्यादी पक्षास हानीकारक आहे.

१५. यातील दोन्ही जखमी साक्षीदारांचे पुरावा हा फिर्यादी पक्षास सहायभूत नाही अशा स्थितीमध्ये यातील आरोपीतांनी खरोखरच गैरकायदा जमाव करून फिर्यादी व त्याचे सहाकारी यांना मारहाण करून दुखापत केली याबाबत सबळ पुरावा आलेला नाही. अशा स्थितीमध्ये आरोपीतांवर ठेवण्यात आलेले दोषारोप सबळ पुराव्याद्वारे साबित करण्यास फिर्यादी पक्ष असमर्थ ठरले आहे. सबब मी मुद्दा क्र.१ ते ८ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.९ करीता:</u>–**

१६. मुद्दा क्र.१ वरील मुद्दा क्र.१ ते ८ यांचे निष्कर्षावरून आरोपीतांवरील दोषारोप सिध्द न झाल्याने आरोपीतांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून मुक्त करण्यात येत आहे. सबब मी मुद्दा क्र.९ यास

अंतीम आदेशाप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

## आदेश

१) आरोपी क्र.१ **रोहीत वेताळ अवताडे,** आरोपी क्र.२ **स्वप्नील मारूती चिकणे,** आरोपी क्र.३ **नितेश संदिप तांबे,** आरोपी क्र.५ **अनुज नरेश मांडले** यांची फौ.प्र.सं. कलम २३५(१) अन्वये भा.दं.वि कलम १४१, १४३, १४७, ३०७, ३२६, ५०४, ५०६ सह १४९ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) १३५ चे दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीतांचे जामीन व बंधपत्र रदद करण्यात येते.

३) आरोपीतांनी फौ.प्र.सं. कलम ४३७ अ अन्वये रू.५,०००/— चा प्रत्येकी वैयक्तीक जातमुलका दयावयाचा आहे.

४) जप्त मुद्देमाल दगड, बांबुची काठी व चाकू व कपडे हे निरर्थक असल्याने ते अपीलाची मुदत संपल्यानंतर नाश करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषीत)

दिनांक — ०३/०२/२०२५
बेलापुर

( पी.अे. साने. )
जिल्हा न्यायाधीश—२ व
अती. सत्र न्यायाधीश,
बेलापुर, नवी मुंबई